# महाराष्ट्र राज्य
# विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## कार्यकारी सारांश

**आर्थिक वर्ष २०१०-११ मधील खर्च व महसूल यांचे अंतिम अचूक समायोजन,**

**आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी एकूण वार्षिक महसूलाची**

**गरज आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीचे वीजदर निश्चितीकरण.**

**(महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग प्रकरण क्र. १९/२०१२)**
**सुधारीत विनंती अर्ज**

# <u>कार्यकारी सारांश</u>

<u>पूर्वपिठीका:</u>

सन्माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एम ई आर सी) यांनी बहुवर्षिय वीजदर विनियम (एम.वाय.टी.) दि. ४ फेब्रुवारी २०११ रोजी प्रसिध्द केले असून सदर विनियम आर्थिक वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या व्दितीय नियंत्रण कालावधीसाठी लागू आहेत. सदर बहुवर्षीय वीजदर विनियम विषयी महावितरण कंपनीने चिंता व्यक्त केली होती व सदर वीजदर विनियमांची अंमलबजावणी प्रलंबित ठेवण्यासाठी एक विनंती अर्ज दि. २२ फेब्रुवारी २०११ रोजी सादर केला. तसेच महावितरणने सदर विनियमांचा पुर्नविचार व्हावा यासाठी पुरवणी विनंती अर्ज दि. २२ मार्च २०११ रोजी सादर केला होता. मा. आयोगाने सदर विनंती अर्जाची सुनावणी घेतली आणि दि. २३ ऑगस्ट २०११ रोजीच्या आदेशानुसार (प्रकरण क्र. २४/२०११) महावितरण कंपनीला दि. ३१ मार्च २०१३ पर्यत (म्हणजे २ वर्षाच्या मुदतीसाठी) बहुवर्षीय वीजदर विनियमानुसार वीजदर निश्चित करण्यापासून सुट दिली आहे.

त्यानंतर मा. आयोगाने म.वि.नि.आयोग (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०११ मध्ये दि. २१ ऑक्टोंबर २०११ रोजी सुधारणा जाहीर केली आहे. या सुधारणेव्दारे बहुवर्षीय वीज दर विनियमानुसार दर निश्चितीपासून सुट दिलेल्या वितरण परवानाधारकास सुट दिलेल्या कालावधीसाठी म.वि.नि.आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ नुसार वार्षिक महसुलीची गरज व वीजदर निश्चितीकरणासाठी दरवर्षी याचिका दाखल करण्याची मुभा दिली आहे.

महावितरणने दि. २४ फेब्रुवारी २०१२ रोजी आर्थिक वर्ष २०१०-११ चे अंतिम अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी एकूण वार्षिक महसूलाची गरज आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीचे वीजदर निश्चितीकरण याकरिता मा.आयोगाकडे विनंती अर्ज सादर केला.

यासंबधी पहिले तांत्रिक वैधता सत्र (टीव्हीएस) दि.२८ मार्च २०१२ रोजी आणि दुसरे तांत्रिक वैधता सत्र दि.१२ एप्रिल २०१२ रोजी आयोजिण्यात आले होते. महावितरणच्या सदर याचिकेबाबत मा. आयोग व प्रधिकृत ग्राहक प्रतिनिधी यांच्याकडून काही त्रुटींविषयी व अधिक माहितीविषयी (डेटा गॅप्स) विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार जादा माहितीची व त्रुटींची पूर्तता केल्यानंतर महावितरणच्या वीजदरापासून भरुन काढावयाच्या निव्वळ महसुलातील तफावतीत बदल झाला आहे. सबब दुस-या तांत्रिक वैधता सत्रादरम्यान मा. आयोगाने महावितरण कंपनीला त्रुटींची पूर्तता विचारात घेऊन सुधारित आकडेवारीनुसार सुधारीत याचिका दाखल करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार महावितरण विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६२ अंतर्गत तसेच म.वि.नि.आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ नुसार सुधारीत विनंती अर्ज पुढील कारणांकरिता सादर करीत आहे.

- वार्षिक लेखापरिक्षीत लेखांवर आधारित आर्थिक वर्ष २०१०-११ चे अंतिम अचूक समायोजन,
- आर्थिक वर्ष २०११-१२ साठी अंदाजित एकूण महसुलाच्या गरजेस (जानेवारी २०१२ पर्यत उपलब्ध असलेल्या प्रत्यक्ष माहितीच्या आधारे विजेची खरेदी व विक्री विचारात घेऊन ) मंजूरी देणे.
- आर्थिक वर्ष २०११-१२ चे अंदाज व इतर वस्तूनिष्ठ बाबी विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी सादर केलेल्या प्रस्तावास मंजूरी देणे.

आर्थिक वर्ष २०१०-११ साठीचे अंतिम अचूक समायोजन:

महावितरणच्या लेखापरिक्षित केलेल्या लेखांनुसार आर्थिक वर्ष २०१०-११ साठीची वार्षिक महसुलाची गरज रु. ३३,५१४ कोटी अशी निश्‍चित करण्यात आली आहे. वीज खरेदी, कर्मचारी खर्च, घसारा, दिर्घ मुदतीच्या भांडवली कर्जावरील व्याज, खेळत्या भांडवलावरील व्याज, समभागावरील परतावा आणि विजेच्या विक्रीपासून मिळालेला महसुल या बाबींसाठीच्या रकमेत यापूर्वी सन्माननीय आयोगाने मंजूर केलेल्या खर्चाच्या तुलनेत फरक झाला आहे. आर्थिक वर्ष २०१०-११ चे समायोजन तसेच आयोगाने प्रकरण क्र. १०० /२०११ संबंधी दिलेल्या आदेशानुसार मंजूर केलेल्या बाबीं आणि प्रत्यक्ष खर्चातील फरक यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(रु. कोटीमध्ये)

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१०-११ (मान्य केल्याप्रमाणे) | आर्थिक वर्ष २०१०-११ (प्रत्यक्ष) | तफावत |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १ | वीज खरेदी खर्च* | २५,२२२ | २५,८८२ | ६५९ |
| २ | संचालन व सुव्यवस्थेविषयक खर्च | २,७७९ | २,८८१ | १०२ |
| २.१ | कर्मचा-यांवरील खर्च | १,८९५ | २,०४७ | १५२ |
| २.२ | आयोगाच्या दि.२९.०६.२००८च्या आदेशाप्रमाणे अर्जित रजा रोखिकरणाचा स्थगित खर्च | ८८ | ८८ | - |
| २.३ | प्रशासन विषयक व सर्वसाधारण खर्च | २६८ | २३२ | (३६) |
| २.४ | दुरुस्ती व देखभाल यावरील खर्च | ५२८ | ५१४ | (१४) |
| ३ | घसारा, घसा-यासाठी घेतलेल्या अग्रीमसहित | ५६८ | ६६० | ९२ |
| ४ | दिर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ३४० | ४८१ | १४१ |
| ५ | खेळते भांडवलासहित ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | २९६ | ४५६ | १६० |
| ६ | बुडित रकमेसाठीची तरतूद | ४४३ | ४९९ | ५६ |
| ७ | अन्य खर्च | (१६) | १५ | ३१ |
| ८ | आयकर | ९६ | १२६ | ३० |
| ९ | पारेषण अनुज्ञाप्तिधारकांना प्रदान केलेला पारेषण आकार | १,८९२ | १,८९२ | ० |
| १० | आकस्मिक खर्चासाठी राखीव निधीची तरतुद | ३३ | २९ | (४) |
| ११ | प्रोत्साहन /सवलत | १३२ | १४३ | ११ |
| १२ | एकूण महसुली खर्च | ३१,७८४ | ३३,०६२ | १,२७८ |
| १३ | भाग भांडवलावरील परतावा | ६१० | ६७६ | ६६ |
| १४ | एकूण महसुलाची गरज | ३२,३९४ | ३३,७३८ | १,३४४ |
| १५ | वजा : वीजदरा व्यतिरिक्त संकिर्ण उत्पन्न | (१,३६१) | (१,२५२) | १०९ |
| १६ | वजा : वहन (व्हिलींग) आकाराणीतून मिळणारे उत्पन्न | (१७) | (१६) | १ |
| १७ | अधिक :आर. एल. सी .परतावा | ५१९ | ५२१ | १ |
| १८ | अधिक: अे.एस. सी. परतावा | २१२ | २१३ | ० |
| १९ | मागील कालावधीतील आकारण्या | - | ३११ | ३११ |

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१०-११ (मान्य केल्याप्रमाणे) | आर्थिक वर्ष २०१०-११ (प्रत्यक्ष) | तफावत |
|---|---|---|---|---|
| २० | किरकोळ दरापासून एकुण महसुलाची गरज | ३१,७४७ | ३३,५१४ | १,७६७ |
| २१ | विद्यमान वीजदराप्रमाणे वीज विक्रीतून मिळणारा महसूल | ३०,९६४ | ३३,२२२ | २,२५८ |
| २२ | वजा : शुन्यभारनियमनाच्या वीजेपासून मिळालेला महसूल | १,४५५ | १,४५५ | (०) |
| २३ | निव्वळ महसूल | २९,५०९ | ३१,७६७ | २,२५८ |
| २४ | महसूलातील तूट | २,२३८ | १,७४७ | (४९१) |

*लेखापरिक्षा लेखांनुसार वीज खरेदी खर्चात शून्य भारनियमनासाठीच्या वीज खरेदी खर्चाचा समावेश नाही.

प्रथम दर्शनी असे दिसते की, आर्थिक वर्ष २०१०-११ करीता मा. आयोगाने मंजूर केलेला वीजेच्या विक्री पासून मिळालेला महसूल आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वार्षिक लेखांमध्ये अंतीमीकरण झालेला महसूल यांत काही फरक आहे. याचे कारण म्हणजे वार्षिक लेखांमध्ये विना देयकाच्या (अनबिल्ड) महसूलासाठी रु. १६२७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. विना देयकाचा महसूल म्हणजे असा महसूल ज्याचे उपार्जन झालेले आहे (अक्रूअल) पण ग्राहकांना त्याचे देयक ३१ मार्च २०११ रोजी देण्यात आलेले नाही. अशी विनादेयक महसूलासाठीची तरतूद करण्याची आवश्यकता असते कारण महावितरण कंपनीचे लेखा उपार्जन तत्वानुसार (अक्रूअल बेसिस) तयार करण्यात येतात व त्यांचे पालन दरवर्षी केले जाते. याशिवाय विनंती अर्जा मध्ये महसूलाचा अंदाज करतांना रु. ३१७ कोटी एवढी रक्कम म्हणजेच भिवंडी वितरण फ्रँचायझी कडून येणारे रु. १७ कोटी व महाराष्ट्र शासनाचे अर्थसहाय्य रु. ३०० कोटी हिशोबात कमी धरलेली होती. तसेच लेख्यांत विचारात घेतलेल्या महसूलामध्ये शुन्य भारनियमनाच्या लाभार्थी ग्राहकांचा विश्वासार्हता आकार (रु.२५१ कोटी) समाविष्ट आहे. हे महावितरणचे महसूली उत्पन्न नसल्याने विनंती अर्जातील महसूलाचा अंदाज करतांना ते विचारात घेतले नव्हते.

आर्थिक वर्ष २०११-१२ व २०१२-१३ साठी एकूण महसूलाची गरज :

आर्थिक वर्ष २०११-१२ आणि २०१२-१३ साठी महावितरणच्या एकूण महसूलाची गरज प्रस्तावित करतांना जानेवारी २०१२ पर्यंतची प्रत्यक्ष उपलब्ध माहिती (विजेची खरेदी व विक्री बाबत) आणि उर्वरित दोन माहिन्यांकरिता करण्यात आलेला अंदाज, आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीचा सुधारित अंदाज आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ यातील तरतुदी विचारात घेतल्या आहेत.

वार्षिक महसूलाची गरज आणि निव्वळ महसूल विचारात घेऊन महावितरणची आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी परिगणित केलेली महसूलातील एकल (स्टॅंड अलोन) तुट खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

(रु. कोटीमध्ये)

| अ.क्र | तपशील | आर्थिक वर्ष २०११-१२ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१२-१३ (प्रस्तावित) |
|---|---|---|---|
| १ | वीज खरेदीचा खर्च | ३१,७०७ | ३६,६२३ |
| २ | संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च | ३,४३७ | ३,८९३ |

| अ.क्र | तपशील | आर्थिक वर्ष २०११-१२ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१२-१३ (प्रस्तावित) |
|---|---|---|---|
| २.१ | कर्मचाऱ्यांवरील खर्च | २,४८५ | २,८२९ |
| २.२ | प्रशासन विषयक व सर्वसाधारण खर्च | ३८७ | ४४२ |
| २.३ | दुरुस्ती व देखभाल यावरील खर्च | ५६६ | ६२२ |
| ३ | घसारा, घसाऱ्यासाठी घेतलेले अग्रिमसहीत | १,०१४ | १,३०९ |
| ४ | दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ८२८ | १,१०२ |
| ५ | खेळते भांडवलासहीत ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ६८३ | ७११ |
| ६ | बुडित रकमेसाठीची तरतूद | ५७२ | ७६१ |
| ७ | अन्य खर्च | १० | ११ |
| ८ | आयकर | - | - |
| ९ | पारेषण अनुज्ञप्ति-धारकांना प्रदान केलेला पारेषण आकार | २,१९९ | २,१९९ |
| १० | आकस्मिक खर्चासाठीच्या राखीव निधीची तरतूद | ५१ | ६६ |
| ११ | प्रोत्साहन / सवलत | १५० | १५८ |
| १२ | एकूण महसुली खर्च | ४०,६५२ | ४६,८३२ |
| १३ | समभाग भांडवलावरील परतावा | ९०३ | १,०४३ |
| १४ | एकूण आवश्यक महसुल | ४१,५५५ | ४७,८७५ |
| १५ | वजा : वीज दरा व्यतिरिक्त मिळणारे अन्य उत्पन्न | (१,३१४) | (१,३७९) |
| १६ | वजा : वहन (व्हिलींग) आकाराणीतून मिळणारे उत्पन्न | (१७) | (१८) |
| १७ | अधिक : वीज नियामक दायित्व आकाराचा परतावा (आर.एल.सी) | ४४३ | |
| १८ | किरकोळ दरापासून आवश्यक असलेला एकूण महसुल | ४०,६६७ | ४६,४७८ |
| १९ | विद्यमान वीजदराप्रमाणे वीज विक्रीतून मिळणारा महसूल | ३८,१३५ | ४३,१२७ |
| २० | वजा : शुन्य भारनियमनाच्या वीजेपासून मिळणारा महसूल | ३२१ | |
| २१ | निव्वळ महसूल | ३७,८१४ | ४३,१२७ |
| २२ | महसूलातील तूट | २,८५३ | ३,३५१ |

*आर्थिक वर्ष २०११-१२ करीताच्या वीज खरेदी खर्चात शुन्य भार नियमनाचा वीज खरेदी खर्च समाविष्ट नाही.*

## वीज खरेदी:-

सर्व उपलब्ध स्त्रोतांकडून वीज मिळविण्यासाठी महावितरण प्रयत्न करते. जानेवारी २०१२ पर्यंत उपलब्ध झालेली प्रत्यक्ष माहिती व उर्वरित दोन महिन्यांसाठीचा अंदाज यावर आधारीत आर्थिक वर्ष २०११-१२ चा स्त्रोत निहाय वीज खरेदी खर्च व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी प्रस्तावित खर्च यांची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

| स्त्रोत | आर्थिक वर्ष २०११-१२ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१२-१३ (प्रस्तावित) |
|---|---|---|

| | वीज खरेदी (दक्षलक्ष युनिट) | खर्च (रु. कोटी) | वीज खरेदी (दक्षलक्ष युनिट) | खर्च (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|
| महानिर्मिती | ४३,७५३ | १३,१९१ | ५१,५९१ | १६,००१ |
| एनटीपीसी | १८,३९४ | ४,६९४ | २३,२५९ | ६,००९ |
| एनपीसीआयएल | ५,२०२ | १,२०३ | ५,१३३ | १,२६१ |
| एसएसपी (सरदार सरोवर) | १,१५१ | २३६ | ९५३ | १९५ |
| पेंच | १३८ | २८ | ६९ | १४ |
| आरजीपीपीएल | ११,२२२ | ४,२३४ | १०,०१४ | ४,२५३ |
| डॉडसन | १२२ | २९ | १२६ | २४ |
| जेएसडब्लू | १,८८० | ६०१ | १,८६२ | ६७१ |
| अडाणी पॉवर | | | ५,३५७ | १,६९६ |
| मुंद्रा यू.एम.पी.पी. | | | २,२०३ | ५०६ |
| मध्यम मुदतीची वीज खरेदी | २,५२६ | १,०४० | ३,०२३ | १,२५८ |
| खाजगी व्यापारी | ८,०९८ | २,९९९ | | |
| शुन्य भारनियमन | ४७६ | २१८ | | |
| अपारंपारिक ऊर्जा | ४,५४७ | १,७६५ | ७,४५४ | ३,३६५ |
| सहवीज प्रकल्प | १,११८ | ५०७ | ८६६ | ४०९ |
| पावरग्रिड | | ८५३ | | ९६० |
| युआय आणि आयबीएसएम | ७९८ | ३३२ | | |
| इतर | | (६) | | - |
| **एकूण** | **९९,४२३** | **३१,९२५** | **१११,९१०** | **३६,६२३** |
| वजा : शुन्यभार नियमनासाठीची वीज खरेदी | ४७६ | २१८ | | |
| **एकूण वीज खरेदी** | **९८,९४८** | **३१,७०७** | **१११,९१०** | **३६,६२३** |

**ऊर्जा संतुलन:**

विजेची उपलब्धता, विक्रीचा पूर्व अंदाज, पारेषण हानी व वितरण हानी यांच्या आधारे महावितरणने आर्थिक वर्ष २०१०-११, आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीच्या ऊर्जा संतुलनाची परिगणना केली आहे. महावितरणने यापूर्वीच्या प्रकरण क्र. १००/२०११ चे विनंती अर्जात आंतरराज्य पारेषण हानी १.१७% सादर केली होती. तथापि आता सुधारीत आकडेवारीनुसार आंतरराज्य पारेषण हानीमध्ये ३.३८% अशी सुधारणा करण्यात आली आहे. तसेच आर्थिक वर्षे २०११-१२ व आर्थिक वर्षे २०१२-१३ साठी प्रस्तावित केलेली पारेषण हानी अनुक्रमे ४.२१% आणि ४.९१% अशी आहे.

अलीकडच्या काही वर्षात महावितरणने वितरण हानी कमी करण्यात लक्षणीय यश मिळविले आहे. हे प्रयत्न यापुढेही कायम राखून उत्तरोत्तर ते वाढविण्यात येतील. मात्र वितरण हानी कमी करण्याची प्रक्रीया ही संथ गतीने होणारी प्रक्रीया आहे. तसेच हानीची पातळी कमी झाल्यावर ती आणखी कमी करणे अधिकच अवघड होते. या बाबीं विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये वितरण हानी १

टक्क्याने व आर्थिक वर्ष २०१२-१३ या वर्षात ती ०.५० टक्क्याने कमी होईल असे महावितरणने गृहीत धरले आहे.

महावितरणचे तीन वर्षांसाठीचे ऊर्जा संतुलन खालील तक्त्यात दाखविण्यात आले आहे.

| अ.क्र. | तपशील | युनिट | आर्थिक वर्ष २०१०-११ | | आर्थिक वर्ष २०११-१२ | आर्थिक वर्ष २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (मान्य केल्याप्रमाणे) | (प्रत्यक्ष) | (अंदाजित) | प्रस्तावित) |
| | महाराष्ट्रांतर्गत | | | | | |
| १ | महानिर्मितीकडून केलेली वीज खरेदी | द. यु. | ४२,२३९ | ४२,२३९ | ४३,७५३ | ५१,५९१ |
| २ | एन पी सी आय एल तारापूर | द. यु. | | ३,६१४ | ४,०१० | ४,४०१ |
| ३ | अन्य स्त्रोतांकडून व मध्यम कालीन वीज खरेदी | द. यु. | १६,६३९ | १६,६३९ | २१,४१६ | २८,७०२ |
| ४ | शुन्यभार नियमन | द. यु. | | १,६५५ | २७१ | |
| ५ | खाजगी व्यापारी | द. यु. | | १,५२६ | ४,४५४ | |
| ६ | आयबीएसएम + एफबीएसएम | द. यु. | २२५ | २२५ | ५५० | |
| ७ | महावितरणच्या प्रणालीतील अन्य वितरण परवानाधारकांची वीज | द. यु. | | | १,५१७ | |
| ८ | युआय | द. यु. | | १,१०८ | २४८ | |
| अ | महाराष्ट्रांतर्गत एकूण वीजखरेदी | द. यु. | ५९,१०३ | ६७,००४ | ७६,२१८ | ८४,६९४ |
| | महाराष्ट्रा बाहेरील | | | | | |
| १ | केंद्रीय विद्युत निर्मिती केंद्र + एनपीसीआयएल + युएमपीपी + केस १+सरदार सरोवर+पेंच | द. यु. | २५,०८४ | २१,४६९ | २०,८७३ | २७,२१६ |
| २ | खाजगी व्यापारी | द. यु. | २,४२० | ८९६ | ३,६४४ | |
| ३ | युआय | द. यु. | १,१०८ | | | |
| ४ | शुन्य भारनियमन | द. यु. | २,६२६ | ९७२ | २०५ | |
| ब | महाराष्ट्रा बाहेरील एकूण वीजखरेदी | द. यु. | ३१,२३८ | २३,३३७ | २४,७२२ | २७,२१६ |
| १ | आंतरराज्य पारेषण हानी | द. यु. | १.१७% | ३.३८% | ४.२१% | ४.९१% |
| २ | महाराष्ट्राच्या परिसीमेवर उपलब्ध एकूण वीज | द. यु. | ३०,८७३ | २२,५४८ | २३,६८२ | २५,८८१ |
| ३ | देय असलेली एकूण वीज खरेदी | द. यु. | ९०,३४१ | ९०,३४१ | १००,९४० | १११,९१० |
| क | पारेषण परिसिमेवरील उपलब्ध असलेली एकूण वीज | द. यु. | ८९,९७६ | ८९,५५३ | ९९,९०० | ११०,५७५ |
| | वितरण परिसीमेवर उपलब्ध वीज | द. यु. | | | | |
| १ | राज्यातंर्गत हानी | द. यु. | ४.२३% | ४.२३% | ४.२९% | ४.२९% |
| २ | वितरण परिसिमेवरील उपलब्ध वीज | द. यु. | ८६,१७० | ८५,७६५ | ९५,६१४ | १०५,८३१ |

| अ.क्र. | तपशील | युनिट | आर्थिक वर्ष २०१०-११ | | आर्थिक वर्ष २०११-१२ | आर्थिक वर्ष २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | (मान्य केल्याप्रमाणे) | (प्रत्यक्ष) | (अंदाजित) | प्रस्तावित) |
| ३ | ३३ केव्ही वाहिनीवरुन अंतक्षेपित करुन ३३ केव्ही वाहिनीवरच वापर झालेली वितरण परिसिमेवरील वीज | द. यु. | | ४०५ | ४६३ | ५१६ |
| ४ | वितरण परिसिमेवर उपलब्ध वीज | द. यु. | ८६,१७० | ८६,१७० | ९६,०७८ | १०६,३४७ |
| ५ | वितरण हानी | % | १८.२०% | १७.२८% | १६.२७% | १५.७७% |
| ६ | वितरण हानी | द. यु. | १५,६८३ | १४,८९० | १५,६३२ | १६,७७१ |
| ड | विक्रीसाठी उपलब्ध वीज | द. यु. | ७०,४८८ | ७१,२८० | ८०,४४६ | ८९,५७६ |

**वीज विक्रीचा अंदाज :**

ऊर्जा संतुलनाद्वारे दर्शविण्यात आलेल्या विक्रीसाठी उपलब्ध वीजेच्या आधारे वर्गवारी निहाय वीजविक्री अंदाजित करण्यात आलेली आहे. मात्र आर्थिक वर्ष २०१०-११ मधील विक्रीची आकडेवारी लेखापरिक्षित विवरणपत्रानुसार दिली आहे. तर आर्थिक वर्ष २०११-१२ साठीची विक्री ही जानेवारी २०१२ पर्यंतच्या वीज विक्रीच्या प्रत्यक्ष माहितीच्या आधारे व उर्वरित दोन महिन्याच्या विक्रीचा अंदाज घेऊन दिली आहे. आर्थिक वर्ष २०१२-१३ चे अंदाज मागील वर्षाच्या विक्रीच्या आधारे केलेले आहेत. प्रस्तावित वीज विक्री सारांश दशलक्ष युनिटमध्ये खालीलप्रमाणे आहे.

| प्रवर्ग | आर्थिक वर्ष २०१०-११ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०११-१२ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०१२-१३ (प्रस्तावित) |
|---|---|---|---|
| उच्चदाब | ३१,३७२ | ३२,९०० | ३७,४३७ |
| लघुदाब | ३९,९०८ | ४७,५४६ | ५२,१३९ |
| एकूण | ७१,२८० | ८०,४४६ | ८९,५७६ |

**महसुलातील तुटीचा सारांश:**

आर्थिक वर्ष २०१२-१३ मधील वीजदरापासून भरुन काढावयाच्या महसूलातील तुटीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१२-१३ (प्रस्तावित) | % |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक वर्ष २०१०-११ साठीची महसूली तूट | (४९१) | -१.१४ |
| २ | आर्थिक वर्ष २०११-१२ साठीची महसूली तूट | २,८५३ | ६.६२ |
| ३ | आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीची महसूली तूट | ३,३५१ | ७.७७ |
| ४ | आर्थिक वर्ष २००८-०९ करिता भांडवली खर्च | २३७ | ०.५५ |

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१२-१३ (प्रस्तावित) | % |
|---|---|---|---|
| ५ | आर्थिक वर्ष २०१०-११ साठीची मान्य झालेली तथापि वसूली करावयाची महसूली तूट | ४०५ | ०.९४ |
| ६ | अपिलिय प्राधिकरण निकाल (१२४/२०१०): आर्थिक वर्ष २००८-०९ साठीच्या तात्पुरत्या अचूक समायोजनातील जादा मंजूर रक्कम | ४२७ | ०.९९ |
| ७ | महानिर्मिती साठीची मंजूर महसूली तूट | ६१० | १.४२ |
| ८ | महापारेषण साठीची मंजूर महसूली तूट | २३० | ०.५३ |
| ९ | वीजदराद्वारे वसूल करावयाची एकूण महसूली तूट | ७,६२३ | १७.६८ |

इतर विषय

- विद्युत अपिलीय प्राधिकरण, दिल्ली यांचे निकालपत्र:

महावितरणने आर्थिक वर्ष २००७-०८ चे समायोजन करणे, वर्ष २००८-०९ च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २००९-१० साठी एकूण महसुलाची गरज आणि दर निश्चिती या संबंधी मा.आयोगाच्या दि. १७/०८/२००९ च्या आदेशाच्या विरोधात (प्रकरण क्र. ११६ /२००८) मा. विद्युत अपिलीय प्राधिकरण, दिल्ली यांचेकडे एक अपिल दाखल केले होते. मा. अपिलीय न्यायाधिकरणाने दि. ३ जानेवारी २०१२ रोजी निकालपत्र देऊन सदर प्रकरणी महावितरणच्या बाजूने निर्णय दिला. त्यास अनुसरुन महावितरण आर्थिक वर्ष २००८-०९ च्या तात्पुरत्या समायोजनात विचारात न घेतलेल्या रु. २१४ कोटी एवढया जादा रकमेच्या परिणामी रु. ४२७ कोटीची ((रु. २१३ कोटी) - रु. २१४ कोटी) मागणी करित आहे.

- आर एल सी परतावा:

आर्थिक वर्ष २०११-१२ साठी आर एल सी परताव्याची अंदाजित रक्कम रु. ४४३ कोटी आहे. मात्र महावितरणने आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी आर. एल. सी. परताव्याची रक्कम विचारात घेतलेली नाही.

इतर सुचना :

विविध वीज निर्मिती कंपन्या व इतर संस्था यांच्याकडून मिळविलेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे महसूलातील तूट आणि त्याअनुषंगाने वीजदर प्रस्तावित करण्यात आले आहेत. या माहितीमध्ये काही प्रकरणी (नियामक संस्थामार्फत घेतल्या जाणा-या निर्णयांसहित) विविध कारणास्तव सुधारणा होण्याची शक्यता आहे. यामुळे महसूलातील तुटीवर आणखी परिणाम होऊ शकतो, तथापि त्याचा अंदाज आत्ताच करता येत नाही. म्हणून मा. आयोगास विनम्रपणे विनंती करण्यात येते की, जेंव्हा असा परिणाम लागू होईल, तेव्हा त्याचा विचार करण्यात यावा आणि जेव्हा असा काही आदेश अमलात येईल तेव्हापासून मा. आयोगाने अशा परिणामाच्या तात्काळ वसुलीसाठी अतिरिक्त आकार लागू करण्याची परवानगी द्यावी.

**मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्था लि.:**

मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्था लिमिटेड, श्रीरामपुर या संस्थेची स्थापना आर्थिक वर्ष १९६९-७० मध्ये झाली. सदर संस्थेस राज्य शासनाने १९७१ साली वीज वितरणाचा २० वर्ष मुदतीचा परवाना दिला व संस्थेचे कार्य दि. १ मार्च १९७१ पासून सुरु झाले. मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्थेने वीज वितरणाची यंत्रणा पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून आपल्याकडे घेतली. सदर वितरण परवान्याचे राज्य सरकारने आणखी २० वर्षासाठी म्हणजे १९९१ ते २०११ साठी नुतनीकरण केले. सदर परवान्याची मुदत दि. ३१ जानेवारी २०११ रोजी संपली.

मुळा प्रवरा संस्था मे २००५ पर्यंत पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून वीज खरेदी करीत होती. त्यानंतर ती महावितरणकडून वीज घेऊ लागली. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची स्थापना झाल्यानंतर मराविमं/महावितरण यांचे वीजदर वेळोवेळी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून निश्चित होऊ लागले. अखेरीस म्हणजे जानेवारी २०१२ मध्ये मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्थेची थकबाकी रु. २६३९.७२ कोटी इतकी वाढली आहे.

मा.आयोगाने आपल्या दि. २७ जानेवारी २०११ रोजीच्या आदेशानुसार मुळा प्रवरा सहकारी संस्थेचा वितरणाचा परवाना मागण्याचा अर्ज फेटाळून लावून महावितरणला परवाना दिला. त्याशिवाय महावितरणच्या परवान्यात दुरुस्ती करुन मुळा प्रवरा संस्थेच्या वीज पुरवठयाचे क्षेत्र महावितरणच्या पुरवठा क्षेत्रात विलीन केले.

याबाबत नंतर मा. विद्युत अपिलीय प्राधिकरण यांनी दि.१६ डिसेंबर २०११ रोजीच्या निकालपत्रानुसार मा. आयोगाचा दि. २७ जानेवारी २०११ रोजीचा आदेश रद्द केला व सदर प्रकरण आयोगाकडे परत पाठविले. त्याद्वारे मुळाप्रवरा सोसायटीच्या परवाना मागणीच्या अर्जाचा पुर्नविचार करावा तसेच एकाच क्षेत्रात दोन्ही संस्थाना कार्य करण्याचा वितरण परवाना देण्याबाबतही विचार करावा, असाही आदेश दिला. मात्र दरम्यानच्या काळात महावितरणने मा. आयोगाच्या दि. २७ जानेवारी २०११ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करुन मुळा प्रवरा विद्युत सह. सोसायटीची वीज वितरण प्रणाली दि. १ फेब्रुवारी २०११ पासून महावितरणकडे घेतली आहे.

महावितरणने आता सादर केलेल्या एकूण महसूलाच्या गरजेसाठीच्या विनंती अर्जात मूळा प्रवरा सोसायटीचे क्षेत्र महावितरणच्या पुरवठयाच्या क्षेत्रात विलीन झाले आहे, हे विचारात घेऊन त्यानुसार वीज विक्री व एकूण महसुलाची गरज इत्यादीचे अंदाज मांडलेले आहेत. यदाकदाचित विद्यूत अपिलीय प्राधिकरणाच्या दि. १६ डिसेंबर २०११ च्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या प्रकरणी मा. आयोगाचा निर्णय महावितरणच्या विरोधात गेला तर त्या निर्णयाचा परिणाम महावितरणच्या एकूण महसूल गरजेच्या विनंती अर्जावर होईल. म्हणून मा. आयोगाने महावितरणाच्या एकूण महसूल गरजेच्या विनंती अर्जावर निर्णय घेण्याच्यावेळी या परिणामाचा योग्य प्रकारे विचार करावा अशी विनंती करण्यात येते.

**वीज दरातील सुधारणा संबंधी सुचना:**

महावितरण वीज दर निश्चितीच्या संदर्भात पुढील सुचना सुचवित आहे.

- **स्थिर आकाराची पुर्नस्थापना करणे:**

उच्चदाब -२ (वाणिज्य) या वर्गवारीतील ग्राहक वगळता, उच्चदाबाच्या सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांसाठी स्थिर आकाराची पुर्नस्थापना आणि प्रमाणीकरण करण्यात यावे, असे महावितरण प्रस्तावित करित आहे. विविध वर्गवारीतील उच्च दाबाच्या ग्राहकांना देय असणारे स्थिर आकार/मागणी आकार यांची पुर्नस्थापना दि. २० ऑक्टोंबर २००६ रोजीच्या वीजदर आदेशामध्ये असलेल्या स्थिर आकार/मागणी आकार यांच्या स्तरावर करण्यात आली आहे. उच्चदाब -२ वाणिज्य - इतर ग्राहक वर्गवारीसाठी यांच्या स्थिर आकारात सध्याच्या रु. १५०/- प्रती केव्हीए प्रती महिना ऐवजी रु. ३००/- प्रती केव्हीए प्रति महिना अशी वाढ सुचविण्यात येत आहे.

मात्र दारिद्रय रेषेखालील घरगुती ग्राहकांना देय असणारे स्थिर आकार प्रती जोडणीस दरमहा रु. ३/- वरुन दरमहा रु. १०/- असे वाढविण्यात आले आहेत. दारिद्ररेषेखालील ग्राहकांव्यतिरिक्त लघुदाब घरगुती ग्राहकांसाठी त्यांच्या वीज वापरानुसार दूरदर्शी पद्धतीने स्थिर आकार असावेत असेही प्रस्तावित करण्यात येत आहे.

याचप्रमाणे लघुदाब वाणिज्य ग्राहकांना (२० केडब्ल्यूच्या वरील) सध्या देय असणारा स्थिर आकार दरमहा रु.१५०/- प्रती केव्हीए ऐवजी दरमहा रु.३००/- प्रती केव्हीए असा वाढवावा, असे महावितरण प्रस्तावित करित आहे. तसेच २० केडब्ल्यु पेक्षा कमी जोडभाराच्या लघुदाब औद्योगिक ग्राहकांना देय असणारा विद्यमान दरमहा रु. १५०/- प्रति जोडणी स्थिर आकार यापुढे दरमहा रु. २२०/- प्रति जोडणी असा वाढवावा आणि २० केडब्ल्यु पेक्षा जास्त जोडभाराच्या ग्राहकांसाठी तो रु. १००/- वरुन दरमहा रु. २००/- प्रति केव्हीए प्रति महिना असा वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

- उद्योगांना उच्चतम मागणी व्यतिरिक्त कालावधीसाठी (ऑफ पीक पिरीयड) सवलत:
  महावितरणने विद्यमान टीओडी प्रोत्साहन/सवलत/दंड यामध्ये कोणताही बदल सुचविलेला नाही. मात्र औद्योगिक ग्राहकांना (उच्चदाब व लघुदाब) विद्युत आकारात उपलब्ध असलेली सवलत विद्यमान ८५ पैसे प्रति युनिट वरुन अधिक प्रमाणात वाढवून ती २५० पैसे प्रति युनिट एवढी देण्याचा प्रस्ताव आहे. ही सवलत रात्रीच्या वेळी (रात्री १०.०० ते पुढील दिवशी सकाळी ६.०० वाजेपर्यंत) असलेल्या वीज वापरावर लागू असेल.

- उच्चतम मागणी व्यतिरिक्त कालावधीतील बिलींग डिमांड :
  बिलींग डिमांड च्या संदर्भातील सध्या असलेल्या तरतुदीमध्ये सुधारणा करावी आणि उच्चतम मागणीच्या काळाव्यतिरिक्त कालावधीत (ऑफ पीक पिरीयड) नोंदल्या जाणाऱ्या वीजेच्या मागणीचा बिलींग डिमांडसाठी विचार केला जावा असे महावितरण मा. आयोगाला प्रस्तावित करित आहे. तसेच महावितरण अशीही सूचना करु इच्छिते की, ज्या ग्राहकांनी रात्रीच्या कालावधीत मंजूर करारातील मागणी (कॉंट्रॅक्ट डिमांड) पेक्षा जास्त वीज वापरली त्यांना "लोडफॅक्टर इन्सेंटीव्ह" देण्यासाठी पात्र समजण्यात येऊ नये. (कारण महावितरणच्या निदर्शनास आले आहे की काही ग्राहकांनी या तरतुदीचा गैरवापर केला आहे)

- करारांर्तगत मागणी (कॉंट्रॅक्ट डिमांड) मध्ये किमान २५ टक्के घट/वाढः

महावितरणला असे निदर्शनास आले आहे की, पुष्कळसे ग्राहक (कॉंट्रॅक्ट डिमांड किरकोळ केव्हीए ने कमी करुन) सध्याच्या बिलिंग डिमांड बाबतच्या तरतुदींचा गैरवापर करतात. "कॉंट्रॅक्ट डिमांड" मध्ये बदल केल्यास बिलिंग डिमांड मधील कमाल मागणी (मॅक्झीमम डीमांड) ११ महिन्याच्या कमाल मागणीच्या ७५ टक्कयांऐवजी एकदम कॉंट्रॅक्ट डिमांडच्या ५० टक्के एवढी कमी झाल्याचे दाखविले जाते. त्यामुळे महावितरणला स्थिर आकारापोटी मिळणा-या महसूलाचे प्रचंड नुकसान होते.

म्हणून महावितरणची मा.आयोगास विनंती आहे की, बिलिंग डिमांड बाबत सध्याच्या तरतुदी लागू करण्याकरिता कॉंट्रॅक्ट डिमांड मधील बदलाची मर्यादा किमान २५ टक्के अशी करावी आणि या तरतुदी मध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

*"कॉंट्रॅक्ट डिमांड" मध्ये जर किमान २५ टक्के बदल झाला तरच वरील कलमात विनिर्देशित केलेल्या कालावधीची गणना ज्या महिन्यात कॉंट्रॅक्ट डिमांड मध्ये बदल झाला त्या पुढील महिन्यापासून करण्यात येईल"*

- घरगुती छोटे व्यवसाय/दुकाने इत्यादीसाठीचे वीजदर :

महावितरण असे सुचवू इच्छिते की घरगुती छोटे व्यवसाय करणाऱ्या वीज ग्राहकांसाठी स्वतंत्र वीज मीटर न बसविता त्यांना लघुदाब १ वर्गवारीनुसार दरमहा १०० युनिटस् पर्यंत वीज वापरण्यास परवानगी देण्यात यावी. सदर सवलत केवळ ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या घरगुती व्यवसाय करणाऱ्या वीज ग्राहकांनाच प्रदान करण्यात यावी. मात्र जर अशा ग्राहकांचा दरमहा कमाल वापर १०० युनिट पेक्षा जास्त झाला तर अशा तिसऱ्या प्रसंगानंतर सदर ग्राहकांस "वाणिज्य ग्राहक" मानण्यात येईल व त्यानंतर त्याला वाणिज्यिक दरानुसार देयकाची आकारणी करण्यात येईल.

- घरगुती/कृषी ग्राहकासाठी विद्युत आकार:

महावितरण असे प्रस्तावित करते की, ० ते १०० युनिट वीज वापराच्या टप्प्यासाठी घरगुती वीज ग्राहकांना देय असणारा विद्युत आकार दरमहा २८२ पैसे प्रति युनिट वरुन ३९० पैसे प्रति युनिट इतका (म्हणजेच ग्राहकापर्यंत पोहचवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या वीज खरेदी खर्चा पेक्षा सुमारे १० टक्क्याने कमी) करण्यात यावा. त्याच प्रमाणे कृषी ग्राहकांना देय असणारा विद्युत आकार प्रति युनिट १७६ पैसे ऐवजी २०५ पैसे प्रति युनिट असा वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

- उच्च दाब व लघु दाब वाणिज्य वर्गवारीमध्ये उपवर्गवारी निर्माण करणे :

महावितरण शासनाच्या मालकीच्या तसेच शासनाच्या व्यवस्थापनातून चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थासाठी एक नवीन उपवर्गवारी लघुदाब / उच्चदाब बिगर घरगुती (वाणिज्य) वर्गवारीमध्ये निर्माण करण्याचे प्रस्तावित करीत आहे. यामध्ये उच्च शैक्षणिक संस्थासहित इतर शैक्षणिक संस्थांचा (म्हणजे जिल्हा परिषद / नगरपरिषद किंवा महानगरपालिका यांच्या शाळा, शासकीय वैद्यकिय/अभियांत्रिकी महाविद्यालये इत्यादी) समावेश केला जाईल. मात्र शासकीय मदत मिळणाऱ्या (गव्हर्नमेंट एडेड) शैक्षणिक संस्थांचा समावेश केला जाणार नाही. शासनाच्या मालकीची तसेच शासकीय व्यवस्थापनातर्फे चालविली जाणारी रुग्णालये (जिल्हा नागरी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे) यांच्यासाठी सुध्दा हेच तत्व अनुसरले जाईल. अशा ग्राहकांना सध्याच्या सरासरी वीज पुरवठा खर्चाच्या स्तराएवढाच वीज दर लावण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय शासन मालकी नसलेल्या शैक्षणिक संस्था व रुग्णालये यांना कोणतीही वीज दर वाढ न करण्याचा महावितरणचा प्रस्ताव आहे. याचाच अर्थ असा की अशा शैक्षणिक संस्था व रुग्णालये यांना लागू असणाऱ्या वीज दरात कोणतीही वाढ केली जाणार नाही.

- लघुदाब वाणिज्य वर्गवारीमध्ये अतिरिक्त वापराचा टप्पा:

लघुदाब बिगर घरगुती वर्गवारीतील (२० केव्ही पर्यंत जोडभार असणाऱ्या) दरमहा ५०० युनिट पेक्षा जास्त वीज वापरणा-या ग्राहकांसाठी वापराचा एक नवीन टप्पा निर्माण करण्याचा महावितरणचा

प्रस्ताव आहे. त्यानुसार लघुदाब बिगर घरगुती ग्राहकांच्या वर्गवारीत वीजदराचे पुढील तीन टप्पे असतील - (१) ० ते २०० युनिट्स, (२) २०० ते ५०० युनीट्स आणि (३) ५०० युनिट्स पेक्षा जास्त.

- इंधन समायोजन आकार:

इंधन समायोजन आकाराच्या वसुलीवर असलेली १० टक्कयाची मर्यादा काढून टाकावी अशी महावितरणची विनंती आहे. अशी मर्यादा नसली तरच वीज खरेदी खर्चात होणा-या वाढीची व मिळवण्यास पात्र असलेली संपूर्ण रक्कम इंधन समायोजन आकारामार्फत वसूल करता येईल.

- प्रत्येक मंडलाच्या वितरण हानीनुसार तेथील वीज दराची संरचना करणे:

एखादया विशिष्ठ भौगोलिक क्षेत्रातील वितरण हानी ही विविध घटकांवर अवलंबून असते. उदा. ग्राहकातील विविधता, उच्चदाब लघु दाब यांचे गुणोत्तर, तेथील पायाभूत सुविधांची स्थिती, वीज पुरवठयाचा विद्युत दाब (व्होल्टेज लेव्हल) इ. ज्या मंडलाची हानी राज्याच्या सरासरी वितरण हानीपेक्षा कमी आहे, तेथील ग्राहकांना असा कोणताही लाभ देणे अवघड होईल. तसेच विविध मंडलातील वितरण हानीची राज्याच्या सरासरी वितरण हानी समवेत तुलना करणे सुद्धा योग्य ठरणार नाही आणि त्याबाबत आग्रह नसावा. म्हणून महावितरणने प्रत्यक्ष वितरण हानीच्या आधारे मंडलनिहाय वीजदराची रचना करण्याबाबत किंवा त्यासंबंधी कोणतेही प्रोत्साहन देण्याबाबत प्रस्ताव सुचविलेला नाही.

- विद्युत दाबावर आधारित वीजदर

विद्युत अधिनियम २००३ नुसार एकत्रित वितरण परवाना अभिप्रेत असून वीजतार व पुरवठा (वायर्स अँड सप्लाय) उद्योगासाठी स्वतंत्र परवाना बंधनकारक नाही. वीजतार व पुरवठा व्यवसाय वेगळा करण्यासाठी अधिनियमात दुरुस्ती तसेच आवश्यक विनियमाची रचना व तांत्रिक सुधारणांची गरज आहे. महावितरण सध्या जुनी लेखा प्रणाली वापरत असून नवीन संगणकीय पद्धती अमलात आणण्याचे काम चालू आहे. परिणामी जुनी माहिती परत मिळविणे खूपच अवघड होईल. अशा प्रकारे कोणतेही विकेंद्रीकरण /विलगीकरण करण्यासाठी खूप मोठया प्रमाणात मनुष्यबळाची गरज भासेल. त्यासाठी परवानाधारकास कर्मचा-यांवर जादा खर्च करावा लागेल. याशिवाय या विद्युतउद्योग व्यवसायातील काही विभागांचे दोन वेगळया व्यवसायात विलगीकरण करणे अशक्यप्राय आहे. उदाहरणार्थ विजेचे उपकेंद्र हे वीज वितरण व पुरवठा या दोन्ही प्रकारच्या कार्याची गरज भागवित असते.

- वहन आकार (व्हिलींग चार्जेस )

मा. आयोगाच्या दि. ०२ डिसेंबर २०१० च्या पुर्नविचार याचिकेवरील आदेशान्वये मान्यता प्राप्त पध्दतीनुसार आणि तारमार्ग जाळे व वीज पुरवठा खर्च विकेंद्रीकरण गुणोत्तरानुसार आणि लघुदाबावरील ओपन ॲक्सेससाठीच्या ग्राहकांसाठी आर्थिक वर्ष २०१०-११ साठीच्या सुरवातीच्या वितरण हानीपेक्षा वितरण हानी १.५% कमी (आर्थिक वर्ष २०११-१२ करिता १% घट आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता ०.५% घट) विचारात घेऊन महावितरणने प्रस्तावित केलेले वहन आकार आणि वहन हानी लघुदाब व उच्चदाब प्रवर्गासाठी आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता पुढीलप्रमाणे आहे.

| तपशील | वहन हानी % | वहन आकार (रु.प्रति युनिट) |
|---|---|---|
| ३३ के.व्ही. स्तर | ६ | ०.१२ |
| २२/११ के.व्ही. स्तर | ९ | ०.६४ |
| लघुदाब स्तर | १२.५० | १.१० |

- **क्रॉस सबसिडी अधिभार:**

  प्रकरण क्र. ४३ /२०१० च्या अनुषंगाने मा. आयोगाने दि. ९ सप्टेंबर २०११ रोजी दिलेल्या आदेशानुसार क्रॉस सबसिडी अधिभार निश्चित करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीच्या एकूण महसूलाची गरज आणि उपरोक्त आदेशाचा विचार करुन महावितरणने खालीलप्रमाणे क्रॉस सबसिडी अधिभार प्रस्तावित केलेला आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | उप प्रवर्ग | टी | सी | एल | डी | १ + एल/१०० | सीएसएस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | % | पैसे प्रति युनिट | | पैसे प्रति युनिट |
| **अति-उच्चदाब** | | | | | | | | |
| १ | औद्योगिक | अविरत उद्योग (एक्स्प्रेस फिडर) | ७.९४ | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ३.२४ |
| | | अविरत नसलेले (बिगर एक्स्प्रेस फिडर) | ७.७७ | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ३.०७ |
| | | हंगामी उद्योग | ९.३१ | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ४.६१ |
| २ | वाणिज्यिक (एक्स्प्रेस) | शैक्षणिक संस्था आणि दवाखाने | १०.५२ | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ५.८३ |
| | | इतर | ११.६९ | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ७.०० |
| | वाणिज्यिक (बिगर एक्स्प्रेस) | शैक्षणिक संस्था आणि दवाखाने | ९.८७ | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ५.१८ |
| | | इतर | ११.१४ | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ६.४५ |
| ३ | रेल्वे | | ७.५० | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | २.८० |
| ४ | एकगठ्ठा पुरवठा | निवासी संकुले | ९.७० | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ५.०१ |
| | | वाणिज्यिक संकुले | ९.७० | ४.४८ | ४.८५ | ० | १.०५ | ५.०१ |
| **उच्चदाब (३३ के.व्ही.)** | | | | | | | | |
| ५ | औद्योगिक | अविरत उद्योग (एक्स्प्रेस फिडर) | ७.९४ | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | २.८७ |
| | | अविरत नसलेले (बिगर एक्स्प्रेस फिडर) | ७.७७ | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | २.७० |
| | | हंगामी उद्योग | ९.३१ | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | ४.२४ |
| ६ | वाणिज्यिक (एक्स्प्रेस) | शैक्षणिक संस्था आणि दवाखाने | १०.५२ | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | ५.४५ |
| | | इतर | ११.६९ | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | ६.६२ |
| | वाणिज्यिक (बिगर एक्स्प्रेस) | शैक्षणिक संस्था आणि दवाखाने | ९.८७ | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | ४.८० |
| | | इतर | ११.१४ | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | ६.०७ |
| ७ | रेल्वे | | ७.५० | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | २.४३ |
| ८ | एकगठ्ठा पुरवठा | निवासी संकुले | ९.७० | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | ४.६३ |
| | | वाणिज्यिक संकुले | ९.७० | ४.४८ | १०.५६ | ०.१२ | १.११ | ४.६३ |

## संकीर्ण व इतर आकार यांची सुची

पुरवठा संहिता विनियमांतील तरतुदींनुसार, मा.आयोगाच्या मंजूरीच्या अधिन राहून, ग्राहकांकडून विविध प्रकारचे आकार वसुली करण्याची परवानगी आहे. मा. आयोगाने दि. ८ सप्टेंबर २००६ च्या आदेशानुसार विविध बाबींसाठी आकाराची सूची निश्चित केली आहे. मात्र गेल्या ५ वर्षात त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेली नाही. चलनवाढ व साधनसामग्री खर्च आणि मजूरी खर्च यांच्यात झालेली प्रत्यक्ष वाढ विचारात घेऊन महावितरणने खाली निर्देशित केल्याप्रमाणे विविध प्रकारच्या आकारात सुधारणा सुचविली आहे.

| अ. क्र. | प्रवर्ग | विद्यमान सेवा जोडणी आकार (रु.) | प्रस्तावित सेवा जोडणी आकार (रु.) | परिवर्ती आकार (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | लघुदाब पुरवठा | | | |
| अ | सिंगल फेज | | | |
| | ५ कि. वॅ.पर्यंत जोडभारासाठी | ५०० | १,००० | निरंक |
| | ५ कि. वॅ.पेक्षा अधिक आणि १० कि. वॅ.पर्यंत जोडभारासाठी | १,००० | २,००० | निरंक |
| ब | थ्री फेज | | | |
| | मोटिव्ह पॉवर २१ एच पी पर्यंत किंवा इतर जोडभार १६ कि.वॅ. पर्यंत | २,५०० | ४,००० | निरंक |
| | मोटिव्ह पॉवर २१ एच पी पेक्षा अधिक परंतू १०७ एच पी पर्यंत किंवा इतर जोडभार ५० कि. वॅ. पेक्षा अधिक परंतू ८० कि.वॅ. पर्यंत | ६,५०० | १०,००० | निरंक |
| | मोटिव्ह पॉवर १०७ एच पी पेक्षा अधिक परंतू २०० एच पी पर्यंत किंवा इतर जोडभार ८० कि. वॅ. पेक्षा अधिक परंतू १५० कि. वॅ. पर्यंत | १२,००० | १७,००० | निरंक |
| २ | उच्चदाब पुरवठा | | | |
| | उच्चदाब पुरवठा ५०० केव्हीए पर्यंत | १५,००० | २४,००० | ५०० के.व्ही.ए पेक्षा अधिक जोडभारासाठी रु. ५० प्रती के.व्ही. ए. |

### नवीन भुमिगत वीजपुरवठा जोडणीसाठी सेवा जोडणी आकार

| अ. क्र. | प्रवर्ग | विद्यमान सेवा जोडणी आकार (रु.) | प्रस्तावित सेवा जोडणी आकार (रु.) |
|---|---|---|---|

| | | (महावितरणच्या सामुग्री खर्चासहित) | |
|---|---|---|---|
| १ | लघुदाब पुरवठा | | |
| अ | सिंगल फेज | | |
| क | ५ कि. वॅ.पर्यंत जोडभारासाठी | २,००० | ४,००० |
| ख | ५ कि. वॅ.पेक्षा अधिक आणि १० कि.वॅ.पर्यंत जोडभारासाठी | ४,००० | ८,००० |
| ब | थ्री फेज | | |
| क | मोटिव्ह पॉवर २७ एच पी पर्यंत किंवा<br>इतर जोडभार २० कि. वॅ. पर्यंत | ८,००० | १४,००० |
| ख | मोटिव्ह पॉवर २७ एच पी पेक्षा अधिक परंतू ६७ एच पी पर्यंत किंवा<br>इतर जोडभार २० कि. वॅ. पेक्षा अधिक परंतू ५० कि. वॅ. पर्यंत | १४,००० | २३,००० |
| ग | मोटिव्ह पॉवर ६७ एच पी पेक्षा अधिक परंतू १३४ एच पी पर्यंत किंवा<br>इतर जोडभार ५० कि. वॅ. पेक्षा अधिक परंतू १०० कि. वॅ. पर्यंत | ३०,००० | ४८,००० |
| घ | मोटिव्ह पॉवर १३४ एच पी पेक्षा अधिक परंतू २०१ एच पी पर्यंत किंवा<br>इतर जोडभार १०० कि. वॅ. पेक्षा अधिक परंतू १५० कि. वॅ. पर्यंत | ४५,००० | ७२,००० |
| २ | उच्चदाब पुरवठा | | |
| अ | उच्चदाब पुरवठा ५०० केव्हीए पर्यंत | १७५,००० | २००,००० |
| ब | उच्चदाब पुरवठा ५०० केव्हीए पेक्षा अधिक | १९५,००० | २२५,००० |

### किरकोळ व सर्वसाधारण आकार

| अ. क्र. | तपशील | विद्यमान (रु.) | प्रस्तावित (रु.) |
|---|---|---|---|
| १ | संचमांडणी चाचणी आकार (इंन्स्टॉलेशन टेस्टींग चार्ज) | | |
| | लघुदाब पुरवठयासाठी | | |
| | अ) सिंगल फेज | २५ | ५० |
| | ब) थ्री फेज | ५० | १०० |
| | उच्चदाब पुरवठयासाठी | २०० | ४०० |
| २ | पुर्नजोडणी आकार | | |
| | लघुदाब पुरवठा<br>मीटर जवळ : | | |
| | अ) सिंगल फेज | २५ | १०० |
| | ब) थ्री फेज | ५० | २०० |
| | विद्युत खांबावरील तारांवर: | | |
| | अ) सिंगल फेज | २५ | १०० |

| अ. क्र. | तपशील | विद्यमान (रु.) | प्रस्तावित (रु.) |
|---|---|---|---|
| | ब) थ्री फेज | ५० | २०० |
| | भुमिगत वाहिनीवर : | | |
| | अ) सिंगल फेज | ५० | २०० |
| | ब) थ्री फेज | ५० | ५०० |
| | उच्चदाब पुरवठा: | ३०० | १,००० |
| ३ | ग्राहक विनंतीनुसार एकाच जागेतील मीटर स्थळ बदल | १०० | ३०० |
| ४ | अ. मीटर चाचणी | | |
| | अ) सिंगल फेज | १०० | २०० |
| | ब) पॉलीफेज मीटर /आर के व्ही ए एच मीटर | ३०० | ५०० |
| | क) एल टी एम डी (सीटी सहित किंवा सीटी विरहित) | ५०० | १,००० |
| | ड) ट्रायव्हेक्टर मीटर | ५०० | ३,००० |
| | इ) मीटरींगसाठीचे संसाधने जसे सी टी/पी टी, प्रती नग लघुदाबासाठी | | १,००० |
| | ख) मीटरींगसाठीचे संसाधने जसे सी टी/पी टी, प्रती नग उच्चदाबासाठी ३३ के.व्ही. सहित | | ३,००० |
| | ग) मीटरींगसाठीचे संसाधन जसे सी टी/पी टी, प्रती नग उच्चदाबासाठी ३३ के.व्ही. पेक्षा जास्त | | ५,००० |
| | ब. चाचणी व गुणवत्ता नियंत्रण प्रयोग शाळेत मीटरची तपासणी | | |
| | अ) सिंगल फेज | | २,००० |
| | ब) थ्री फेज | | ९,५०० |
| | क) एल टी सी टी ओ पी मीटर | | १०,००० |
| | ड) उच्चदाब टीओडी मीटर | | १५,००० |
| | इ) अे बी टी /ॲपेक्स | | २०,००० |
| ५ | उच्चदाब ग्राहकांसाठी मीटर कार्डचे बदलीकरण | निरंक | - |
| ६ | धनादेश परताव्याचे प्रशासकीय शुल्क | २५०/- कोणत्याही रकमेसाठी | ३५०/- |

महावितरण कंपनीने ओपन ॲक्सेस करिता अर्जासाठी खालीलप्रमाणे संचालन आकार (ऑपरेटिंग चार्ज) आणि प्रक्रिया शुल्क (प्रोसेसिंग फी) प्रस्तावित केले आहे.

| मागणी केलेला वीजभार (लोड रिक्वीजीशन) | प्रक्रिया शुल्क प्रती अर्ज (रु.) | संचालन आकार प्रती महिना (रु.) |
|---|---|---|
| १ मे.वॅ. पर्यंत | १०,०००/- | १०,०००/- |
| १ मे. वॅ. पेक्षा अधिक आणि ५ मे.वॅ. पर्यंत | १५,०००/- | १०,०००/- |
| ५ मे. वॅ. पेक्षा अधिक आणि २० मे.वॅ. पर्यंत | ३०,०००/- | २०,०००/- |
| २० मे. वॅ. पेक्षा अधिक आणि ५० मे.वॅ. पर्यंत | ५०,०००/- | ५०,०००/- |

| मागणी केलेला वीजभार (लोड रिक्वीजीशन) | प्रक्रिया शुल्क प्रती अर्ज (रु.) | संचालन आकार प्रती महिना (रु.) |
|---|---|---|
| ५० मे. वॅ. पेक्षा अधिक | १,००,०००/- | १,००,०००/- |

प्रयोज्यतेतील (ॲप्लीकेबीलीटी) बदल

वीज पुरवठयाचे स्वरुप, वीज वापराचा हेतू इ.नुसार विजेच्या प्रत्येक ग्राहकास विशिष्ट वीजदर लागू होतात. यानुसार ग्राहकाचा प्रवर्ग किंवा वर्गवारी निश्चित होते. मा. आयोगाने यानुसार विजेच्या ग्राहकांची विविध प्रर्वगात वर्गीकरण केले आहे. ही वर्गवारी वीजेच्या पुरवठयाचे स्वरुप (म्हणजे लघुदाब किंवा उच्चदाब), वीज पुरवठयाचा हेतू (म्हणजे घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी इ.) इत्यादींवर अवलंबून असते. अलीकडच्या काही काळात असे निदर्शनास आले आहे की एखादया ग्राहकाचे एका विशिष्ठ प्रवर्गात वर्गीकरण केल्यामुळे न्यायालयीन वाद निर्माण झाले आहेत. याचे कारण एका विशिष्ट वर्गवारीमध्ये कोणत्या ग्राहकांचा समावेश होतो याची माहिती परिपूर्ण स्वरुपात उपलब्ध नसते. महावितरणने या विषयी परिक्षण केले व क्षेत्रीय अधिका-यांचा अनुभव व निरीक्षण यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे ग्राहकांच्या विविध वर्गवारीसाठीचे दर कोणत्या ग्राहकांना लागू होतात (प्रयोज्यता) याची व्याख्या परिपूर्ण स्वरुपात निश्चित करण्याचा प्रस्ताव सुचविला आहे. त्यानुसार महावितरणने दराच्या प्रयोज्यतेत केलेले वर्गीकरण व सुधारणा विनंती अर्जात दर्शविले आहे.

वीज दराची सूची

महावितरणने वर सुचविलेली दराची तात्विक भूमिका विचारात घेऊन खालीलप्रमाणे सुधारीत दर प्रस्तावित केले आहेत. येथे नमूद करण्यात येते की केवळ तूलना करण्याकरिता ग्राहकांच्या विविध वर्गवारींना लागू होणारा इंधन समायोजन आकार हा विद्यमान विद्युत आकारात समाविष्ट केला आहे कारण वीजदरात सुधारणा झाल्यानंतर देय असणारा इंधन समायोजन आकार 'निरंक' होईल.

उच्चदाब ग्राहकांसाठी विद्यमान व प्रस्तावित वीजदरांची तुलना

| ग्राहक प्रवर्ग | विद्यमान वीजदर | | | | | प्रस्तावित वीजदर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार | अतिरिक्त विद्युत आकार (२ डिसेंबर २०१० च्या आदेशान्वये) | अतिरिक्त विद्युत आकार (३१ ऑक्टोबर २०११ च्या आदेशान्वये) | एकूण विद्युत आकार | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार |
| | रु. प्रति केव्हीए प्रति महिना | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | रु. प्रति केव्हीए प्रति महिना | पैसे प्रति युनिट |
| उच्च दाब प्रवर्ग | | | | | | | |
| उच्च दाब १ - औद्योगिक | | | | | | | |
| उच्च दाब १ अविरत (एक्स्प्रेस फिडर) | १५० | ५८७ | २२ | ५४ | ६६३ | ३०० | ६९० |

| ग्राहक प्रवर्ग | विद्यमान वीजदर | | | | | प्रस्तावित वीजदर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार | अतिरिक्त विद्युत आकार (२ डिसेंबर २०१० च्या आदेशान्वये) | अतिरिक्त विद्युत आकार (३१ ऑक्टोंबर २०११ च्या आदेशान्वये) | एकूण विद्युत आकार | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार |
| | रु. प्रति केव्हीए प्रति महिना | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | रु. प्रति केव्हीए प्रति महिना | पैसे प्रति युनिट |
| उच्च दाब १ अविरत नसलेले ( बिगर एक्स्प्रेस फिडर) | १५० | ५३५ | २० | ४९ | ६०४ | ३०० | ६३५ |
| उच्च दाब १ हंगामी प्रवर्ग | १५० | ६५७ | २४ | ६१ | ७४२ | ३०० | ७६० |
| उच्च दाब २ - वाणिज्यिक | | | | | | | |
| एक्स्प्रेस फिडर | | | | | | | |
| शासन मालकीच्या शैक्षणिक संस्था आणि दवाखाने - प्रस्तावित | १५० | ८५३ | ३२ | ७८ | ९६३ | १५० | ६४५ |
| शैक्षणिक संस्था आणि दवाखाने | १५० | ८५३ | ३२ | ७८ | ९६३ | १५० | ९६५ |
| इतर | १५० | ८८६ | ३३ | ८२ | १,००१ | ३०० | ९९५ |
| बिगर एक्स्प्रेस फिडर | | | | | | | |
| शासन मालकीच्या शैक्षणिक संस्था आणि दवाखाने - प्रस्तावित | १५० | ७९७ | ३० | ७३ | ९०० | १५० | ५६० |
| शैक्षणिक संस्था आणि दवाखाने | १५० | ७९७ | ३० | ७३ | ९०० | १५० | ९०० |
| इतर | १५० | ८३० | ३१ | ७६ | ९३८ | ३०० | ९४० |
| उच्च दाब ३ - रेल्वे | ० | ६४६ | २४ | ६० | ७३० | ० | ७५० |
| उच्च दाब ४ - सा.पाणीपुरवठा | | | | | | | |
| (एक्स्प्रेस फिडर) | १५० | ४१८ | १६ | ३९ | ४७२ | ३०० | ५१५ |
| (बिगर एक्स्प्रेस फिडर) | १५० | ४०१ | १५ | ३७ | ४५३ | ३०० | ५०० |
| उच्च दाब ५ - कृषी | २५ | २४० | ९ | २२ | २७१ | २५ | २७५ |
| उच्च दाब ६ - एक गठठा पुरवठा निवासी संकुले | १२५ | ४१५ | १५ | ३८ | ४६८ | १५० | ९१५ |
| उच्च दाब ६ - एक गठठा पुरवठा वाणिज्यिक संकूले | १२५ | ७०२ | २६ | ६८ | ७९६ | ३०० | ८१० |
| उच्च दाब ८(अ) - तात्पुरता धार्मिक पुरवठा | २०० | २८१ | १० | २६ | ३१७ | २०० | ३७५ |
| उच्च दाब ८ (ब) - तात्पुरता इतर पुरवठा | २५० | १,२८२ | ४८ | ११८ | १,४४८ | २५० | १,४०० |

*टिपः तुलना करण्यासाठी वेगवेगळया प्रवर्गासाठी लागू होणा-या इंधन समायोजन आकाराचा समावेश प्रचलित विद्यूत आकारात करण्यात आला आहे.*

**प्रस्तावित टी.ओ.डी. आकार**

**टी.ओ.डी. आकार (मुळ वीजदराव्यतिरिक्त)**

**औद्योगिक ग्राहकांकरिता फक्त**

| वेळ | विद्यमान (सवलत/दंड) | प्रस्तावित (सवलत/दंड) |
|---|---|---|
| | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट |
| ०६ ते ०९ | ० | ० |
| ०९ ते १२ | ८० | ८० |
| १२ ते १८ | ० | ० |
| १८ ते २२ | ११० | ११० |
| २२ ते ०६ | -८५ | -२५० |

**टिपः इतर वर्गवारींसाठी टीओडी आकार हा विद्यमान आकाराइतकाच प्रस्तावित करण्यात येत आहे.**

**लघुदाब ग्राहकांसाठी विद्यमान व प्रस्तावित वीजदराची तुलना**

| ग्राहक प्रवर्ग | विद्यमान वीजदर | | | | | प्रस्तावित वीजदर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार | अतिरिक्त विद्युत आकार (२ डिसेंबर २०१० च्या आदेशान्वये) | अतिरिक्त विद्युत आकार (३१ ऑक्टोंबर २०११ च्या आदेशान्वये) | एकूण विद्युत आकार | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार |
| | रु. प्रति जोडणी प्रति महिना | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | रु. प्रति जोडणी प्रति महिना | पैसे प्रति युनिट |
| लघुदाब १ - घरगुती | | | | | | | |
| बीपीएल (०-३० युनिट) | ३ | ८७ | ३ | ८ | ९८ | १० | ९० |
| दरमहा ३० युनिटपेक्षा अधिक वापर | | | | | | | |
| ०-१०० युनिटस | ३० | २७५ | १० | २५ | ३११ | ६० | ३९० |
| १०१-३०० युनिटस | ३० | ४८७ | १८ | ४५ | ५५० | ६० | ५८५ |
| ३०१-५०० युनिटस | ३० | ६९७ | २६ | ६४ | ७८७ | ९० | ८०० |
| ५००-१००० युनिटस | ३० | ८०८ | ३० | ७४ | ९१२ | १२० | ९१५ |
| १००० युनिटस पेक्षा अधिक | ३० | ८३६ | ३१ | ७४ | ९४१ | १२० | ९४० |
| ३ फेज जोडणी | १०० | | | | | २०० | |
| लघुदाब २ - बिगर घरगुती | | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. | | | | | | | |

| ग्राहक प्रवर्ग | विद्यमान वीजदर | | | | | प्रस्तावित वीजदर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार | अतिरिक्त विद्युत आकार (२ डिसेंबर २०१० च्या आदेशान्वये) | अतिरिक्त विद्युत आकार (३१ ऑक्टोंबर २०११ च्या आदेशान्वये) | एकूण विद्युत आकार | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार |
| | रु. प्रति जोडणी प्रति महिना | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | रु. प्रति जोडणी प्रति महिना | पैसे प्रति युनिट |
| ०-२० कि.वॅ. (शासन मालकीच्या शैक्षणिक संस्था आणि दवाखाने) | | | | | | | |
| ०-२०० युनिटस | १५० | ४७९ | १८ | ४४ | ५४१ | १५० | ४०५ |
| २००-५०० युनिटस | १५० | ६६९ | २५ | ६२ | ७५५ | १५० | ५६५ |
| ५०० युनिटस पेक्षा अधिक | १५० | ६९४ | २५ | ६२ | ७८० | १५० | ५८५ |
| ०-२० कि.वॅ. (शैक्षणिक संस्था आणि दवाखाने) | | | | | | | |
| ०-२०० युनिटस | १५० | ४७९ | १८ | ४४ | ५४१ | १५० | ५४० |
| २०० युनिटस पेक्षा अधिक | १५० | ६६९ | २५ | ६२ | ७५५ | १५० | ७५५ |
| ५०० युनिटस पेक्षा अधिक | १५० | ६९४ | २५ | ६२ | ७८० | १५० | ७८० |
| ०-२० कि.वॅ.(इतर) | | | | | | | |
| ०-२०० युनिटस | १५० | ५०२ | १९ | ४६ | ५६७ | १५० | ६०० |
| २००-५०० युनिटस | १५० | ७१९ | २७ | ६६ | ८१२ | १५० | ८२५ |
| ५०० युनिटस पेक्षा अधिक | १५० | ७१९ | २७ | ६६ | ८१२ | १५० | ८५० |
| >२०- ५० कि.वॅ. * | १५० | ७२४ | २७ | ६७ | ८१८ | ३०० | ८३० |
| >५० कि.वॅ. * | १५० | ९३६ | ३५ | ८६ | १,०५७ | ३०० | १,०५० |
| लघुदाब ३ - सा.पाणीपुरवठा | | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. * | ४० | १९२ | ७ | १८ | २१६ | ५० | २८५ |
| २०-४० कि.वॅ. * | ५० | २४७ | ९ | २३ | २७९ | ६० | ३४० |
| ४०-५० कि.वॅ. * | ७० | ३३७ | १२ | ३१ | ३८० | ९० | ४३० |
| लघुदाब ४ - कृषी | | | | | | | |
| मीटर रहितचा दर | | | | | | | |
| *वार्षिक >१३१८ तास / अ.श. वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे *** | | | | | | | |
| ०-५ एच पी | २३५ | | १० | २७ | २७२ | २९० | |

| ग्राहक प्रवर्ग | विद्यमान वीजदर | | | | | प्रस्तावित वीजदर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार | अतिरिक्त विद्युत आकार (२ डिसेंबर २०१० च्या आदेशान्वये) | अतिरिक्त विद्युत आकार (३१ ऑक्टोंबर २०११ च्या आदेशान्वये) | एकूण विद्युत आकार | स्थिर/मागणी आकार | विद्युत आकार |
| | रु. प्रति जोडणी प्रति महिना | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट | रु. प्रति जोडणी प्रति महिना | पैसे प्रति युनिट |
| ५ एच पी पेक्षा अधिक | २६४ | | १० | २७ | ३०१ | ३१५ | |
| *वार्षिक < १३१८ तास / अ.श. वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे*** | | | | | | | |
| ०-५ एच पी | १८८ | | ८ | १३ | २०९ | २३० | |
| ५ एच पी पेक्षा अधिक | २१२ | | ८ | १३ | २३३ | २५५ | |
| मीटरचे दर (कुक्कुट पालन सहित ) ** | १५ | १६२ | ६ | १६ | १८३ | १५ | २०५ |
| लघुदाब ५ - उद्योग | | | | | | | |
| ०-२० कि.वॅ. | १५० | ४३५ | १६ | ४० | ४९१ | २२० | ५३५ |
| २० कि.वॅ. पेक्षा अधिक * | १०० | ६०२ | २२ | ५५ | ६७९ | २०० | ७०५ |
| लघुदाब ६ - पथ दिवे *** | | | | | | | |
| ग्रामपंचायत व नगरपालिका | ३० | ३४५ | १३ | ३२ | ३९० | ३० | ४४० |
| महानगर पालिका | ३० | ४१२ | १५ | ३८ | ४६५ | ६० | ५१० |
| लघुदाब ७ - तात्पुरता विद्युत पुरवठा | | | | | | | |
| तात्पुरत्या जोडण्या (धार्मिक प्रयोजन) | २०० | २८१ | १० | २६ | ३१७ | २०० | ३७५ |
| तात्पुरत्या जोडण्या (अन्य प्रयोजन) | २५० | १२८२ | ४८ | ११८ | १४४८ | २५० | १४०० |
| लघुदाब ८ - जाहिराती आणि प्रसिध्दी फलक | ४०० | १७८३ | ६६ | १६४ | २०१३ | ४०० | १८३० |
| लघुदाब ९ - स्मशानभूमी आणि दफनभूमी | २०० | २८१ | १० | २६ | ३१७ | २०० | २९० |

*टिप: तुलना करण्यासाठी वेगवेगळया प्रवर्गासाठी लागू होणा-या इंधन समायोजन आकाराचा समावेश प्रचलित विद्युत आकारात करण्यात आला आहे.*

* स्थिर/मागणी आकार रु. प्रति के.व्ही.अे. प्रति महिना मध्ये

** स्थिर/मागणी आकार रु. प्रति एच पी प्रति महिना मध्ये

*** स्थिर/मागणी आकार रु. प्रति कि.वॅ. प्रति महिना मध्ये

<u>प्रार्थनाः</u>

सन्माननीय आयोगास महावितरण कंपनीची आदरपूर्वक प्रार्थना आहे की, त्यांनी खालील प्रस्तावांना मंजूरी द्यावी.

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ मधील तरतुदींनुसार, आर्थिक वर्ष २०१०-११ चे अंतिम अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी एकूण वार्षिक महसूलाची गरज आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीचे वीजदर निश्चितीकरण मंजुरीसाठीचा सदर विनंती अर्ज दाखल करुन घ्यावा,

२. महावितरणने प्रस्तावित केलेल्या आर्थिक वर्ष २०१०-११ चे अंतिम अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी एकूण वार्षिक महसूलाची गरजेपोटी तसेच इतर बाबींच्या संपूर्ण वसूलीस मंजूरी दयावी.

३. मा. केंद्रीय विद्युत नियामक आयोग (दरांच्या अटी व शर्ती) विनियम २००९-१४ अन्वये केंद्रिय विद्युत नियामक आयोग यांच्या आदेशानुसार केंद्रीय वीज निर्मिती केंद्राच्या स्थिर आकारात काही बदल झ ाल्यास त्या अनुषंगाने अतिरिक्त आकार वसुलीस परवानगी देण्यात यावी.

४. महावितरणने विविध ग्राहक वर्गवारीसाठी सुचविण्यात आलेल्या वीजदरातील सुधारणांना मंजुरी दयावी.

५. दि. २० ऑक्टोबर २००६ च्या वीजदर आदेशानुसार उच्चदाब वर्गवारीतील सर्व ग्राहकांना (उच्चदाब २ वाणिज्य वगळता) स्थिर आकाराची पुर्नस्थापना करण्यात यावी आणि प्रस्तावित केल्याप्रमाणे स्थिर आकारांचे प्रमाणीकरण करण्यात यावे. तसेच स्थिर खर्चाची संपूर्ण वसुली स्थिर आकरांतूनच व्हावी यासाठी स्थिर आकार टप्प्याटप्प्याने वाढविण्यासाठी एक मार्गदर्शक आराखडा (रोड मॅप) तयार करण्यात यावा. उच्चदाब २ वाणिज्य (इतर) या वर्गवारीसाठी सध्याचा रु. १५०/- प्रति केव्हीए प्रति महिना हा आकार रु. ३००/- प्रति केव्हीए प्रति महिना असा वाढविण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळावी.

६. दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) वर्गवारीसाठी स्थिर आकार रु. ३/- प्रति जोडणी प्रति महिना याऐवजी रु. १०/- प्रति जोडणी प्रति महिना असा वाढविण्यास मंजूरी दयावी ; तसेच घरगुती वर्गवारीतील ग्राहकांना (०-३०० युनिट पर्यंत वापर) प्रति जोडणी प्रति महिना ३० ऐवजी ६० रुपये याप्रमाणे आणि ३०० ते ५०० युनिट वापरणा-या घरगुती ग्राहकांना प्रति जोडणी प्रति महिना रु. ३० ऐवजी ९० याप्रमाणे आणि ५०० ते १००० युनिट वापरणा-या घरगुती ग्राहकांना प्रति जोडणी प्रति महिना रु. ३० ऐवजी रु. १२०/- या प्रमाणे स्थिर आकार वाढविण्यास मंजुरी द्यावी.

७. लघुदाब वाणिज्य वर्गवारीतील २० के.डब्ल्यू. वरील ग्राहकांसाठीचा स्थिर आकार रु. १५०/- प्रति केव्हीए प्रति महिना यावरुन रु. ३००/- प्रति केव्हीए प्रति महिना असा वाढविण्यास मंजुरी मिळावी.

८. लघुदाब औद्योगिक ग्राहकांपैकी २० के.डब्ल्यू.पर्यंतच्या वीज ग्राहकांचा स्थिर आकार रु. १५०/- वरुन रु. २००/- प्रति जोडणी प्रति महिना याप्रमाणे आणि २० के.डब्ल्यू.च्या वरील ग्राहकांचा स्थिर आकार रु. १०० वरुन रु. २००/- प्रति केव्हीए प्रति महिना असा वाढविण्यास मंजुरी मिळावी.

९. उच्चदाब व लघुदाब औद्योगिक ग्राहकांना रात्रीच्या वेळी वीज वापराकरिता (रात्रौ १०.०० ते दुस-या दिवशी सकाळी ६.०० वाजेपर्यंत) लागू असणारी टीओडी सवलत विद्यमान ८५ पैसे प्रति युनिट वरुन २५० पैसे प्रति युनिट याप्रमाणे लागू करण्यास मंजूरी द्यावी.

१०. नागपूर शहरात सध्या वाहतूकीस अडथळयाचे ठरणारे विजेचे खांब/तारमार्ग इ. हलविण्यासाठी लागणा-या प्रत्यक्ष भांडवली खर्चापैकी ५०% खर्च नागपूर महानगर पालिकेच्या भौगोलिक अधिकार क्षेत्रातील गांधीबाग, महाल, काँग्रेस नगर आणि सिव्हील लाईन्स या नागपूर शहर मंडलातर्गत विभागातील ग्राहकांकडून २९ पैसे प्रति युनिट या दराने बारा महिन्यांकरिता " पायाभूत आकार" च्या माध्यमातून वसूल करण्यास परवानगी मिळावी.

११. जेथे स्थानिक संस्था आणि/किंवा ग्राहक महावितरण कंपनीला विद्युत खांब इ. हलविण्यासाठी विनंती करतात अथवा लघुदाब व उच्च दाब ओव्हरहेड तारमार्गाचे भूमिगत मार्गात परिवर्तन करु इच्छितात (प्रणाली सुधारणा आणि वितरण हानी कमी करण्याच्या उद्देशा व्यतिरिक्त करण्यात आलेली कामे) अशा क्षेत्रात याच प्रकारचे धोरण अनुसरण्यास परवानगी मिळावी.

१२. विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींनुसार ज्या ग्राहकांना ओपन ॲक्सेस साठी परवानगी देण्यात आली आहे अशा ग्राहकांना आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी प्रस्तावित केलेल्या क्रॉस सबसिडीच्या अचूक स्तरावर आधारीत क्रॉस सबसिडी सरचार्ज, व्हिलींग चार्जेस (व्हिलींग हानीसहीत) यांच्या समावेशासह इतर सर्व आकार आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी मंजूर करावेत.

१३. बिलींग डिमांड मधील विद्यमान तरतुदी लागू होण्यासाठी काँन्ट्रक्ट डिमांडमध्ये बदल करण्यारिता किमान २५ टक्के इतकी मर्यादा घालून दयावी आणि सध्याच्या तरतुदींमध्ये महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

१४. 'बिलींग डिमांड' साठीच्या सध्याच्या तरतुदींमधे सुधारणा करण्यात यावी आणि त्यानुसार उच्चतम मागणी कालावधी व्यतिरिक्त इतर वेळेत नोंदलेली वीज मागणी बिलींग करण्याकरीता विचारात घेण्यात यावी.

१५. जे ग्राहक रात्रीच्या वेळी कॉट्रॅक्ट डिमांड पेक्षा जास्त वीज वापरतील त्यांना लोड फॅक्टर इंन्सेटीव्ह देण्याच्या संदर्भात दुरुस्ती करण्यास मंजुरी दयावी.

१६. दरमहा ० ते १०० युनिट पर्यंतच्या टप्प्यातील वीज वापरासाठी घरगुती ग्राहकांना प्रस्तावित केलेला विद्युत आकार मंजुर करावा.

१७. उच्च शिक्षण संस्थांसहित शासकीय मालकीच्या तसेच शासकीय व्यवस्थापनातर्फे चालविल्या जाणा-या, शैक्षणिक संस्थासाठी (यामधे जिल्हा परिषदा/नगर परिषदा व महापालिकांच्या शाळा, शासकीय वैद्यकीय/अभियांत्रिकी महाविद्यालये इ. समाविष्ट) लघु/उच्च दाबाच्या बिगर घरगुती (वाणिज्य) वर्गवारीमध्ये नवीन उपवर्गवारी निर्मितीस परवानगी देण्यात यावी. याच धर्तीवर शासकीय मालकीची, तसेच शासकीय व्यवस्थापनातर्फे चालविली जाणारी रुग्णालये (उदा. जिल्हा नागरी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे इ.) यांच्यासाठी उपवर्गवारी निर्माण करण्याचा प्रस्ताव केला आहे त्यास मंजुरी मिळावी.

१८. लघुदाब बिगर घरगुती ग्राहकांच्या (० ते २० केडब्ल्यू) उपवर्गवारीत वीजदराचे पुढील तीन टप्पे लागू करण्यास मंजुरी मिळावी. ते असे (१) शुन्य ते २०० युनिटस (२) २०० ते ५०० युनिटस आणि (३) ५०० युनिटस पेक्षा अधिक.

१९. इंधन समायोजन आकारावरील १० टक्क्याची कमाल मर्यादा रद्द करावी.

२०. महावितरणने प्रस्तावित केलेल्या सुधारित वीज दराच्या प्रयोज्जतेस मान्यता देण्यात यावी.

२१. याशिवाय मा. आयोगास यथोचित वाटेल असे अन्य कोणतेही सहाय्य, मदत मंजूर करावी.

२२. महावितरणने प्रस्तावित केलेली आकारांची अनुसूची (भाग अ व भाग ब) मंजुर करण्यात यावी.

२३. माननीय आयोगास योग्य वाटेल असे अन्य कोणतेही आदेश, प्रकरणातील परिस्थिती व न्यायहिताच्या दृष्टीने देण्यात यावेत.

२४. कोणतीही चूक/भूल झाली असल्यास ती क्षमापित करावी आणि ती सुधारण्याची संधी देण्यात यावी.

२५. सदर विनंती अर्ज सादर कर्त्यास या अर्जात कालानुरुप कोणतीही भर टाकणे किंवा त्यात बदल करणे तसेच अतिरिक्त माहिती सादर करण्याची परवानगी देण्यात यावी.